# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.07.2024** **वारःशुक्रवार**

---

1. संसदेत आणि विधीमंडळात सर्वपक्षियांमध्ये मैत्रीपूर्ण संवाद आवश्यक असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं प्रतिपादन
2. राज्यातल्या 18 वर्षांवरच्या व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधक लस देणार -आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांची विधानसभेत माहिती
3. विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी आज मतदान
4. प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्यावरच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारकडून समिती स्थापन आणि
5. यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार जेष्ठ संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांना जाहीर

**उपराष्ट्रपती**

संसदेत आणि विधीमंडळात सर्व पक्षीय नेत्यांमध्ये मैत्रीपूर्ण संवाद आवश्यक आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. राज्य विधीमंडळाच्या सदस्यांना त्यांनी काल मुंबईत विधानसभेच्या सभागृहात संयुक्तरित्या संबोधित केलं. सत्ताधारी आणि विरोधक एकत्र आले तरच जनतेच्या समस्या सोडवू शकतात. त्यामुळे लोकांच्या भल्यासाठी काम करा असं आवाहन त्यांनी केलं. संसद आणि विधीमंडळातल्या सध्याच्या कामकाजाबाबत त्यांनी स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली. गदारोळ घालण्याच्या प्रयत्नांना अजिबात प्रोत्साहन देऊ नका, शिस्तीचं पालन करणाऱ्यांना अधिकाधिक संधी द्या असं आवाहन त्यांनी सर्व राजकीय पक्षांना केलं. लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी परस्परांमध्ये संवाद ठेऊन समन्वयानं काम करावं असं आवाहन उपराष्ट्रपतीनी केलं. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यपद्धतीचा दाखला उपस्थितांना दिला. महिला, युवा, हवामान बदल यासह जनतेच्या विविध प्रश्नांना कामकाजात प्राधान्य देण्याचं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी यावेळी बोलताना केलं. तर भारतीय लोकशाही बळकट करण्याची भूमिका उपराष्ट्रपतींनी नेहमीच घेतली आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर तसंच विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही यावेळी आपले विचार मांडले.

**विधानमंडळ**

2025 पर्यंत क्षयमुक्त भारत करण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून 18 वर्षांवरच्या सर्व व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधक लस देण्याची मोहीम राज्यात राबवली जाणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी काल विधानसभेत दिली.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर सरकारनं शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती देऊन त्यांचं थकित वीजबिल माफ करावं, अशी मागणी विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी काल विधानसभेत केली.

राज्य सरकारने मुस्लिमांना आरक्षण द्यावं, अशी मागणी आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत केली. यावर संविधानात धर्मावर आधारित आरक्षणाची तरतूद नाही, त्यामुळं मुस्लिमांमधल्या मागास जातींना आरक्षण दिली असल्याची प्रतिक्रिया मंत्री

सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. तर धनगर समाजाला अनुसूचित जातींमध्ये आरक्षण द्यावं, अशी मागणी आमदार यशोमती ठाकूर यांनी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखं येत्या 19 जुलैपासून साताऱ्यातल्या सरकारी संग्रहालयात ठेवली जातील. यावेळी शिवाजी महाराजांच्या शस्त्रास्त्रांचं प्रदर्शनही भरवलं जाईल, अशी माहिती सुधीर मुनगंटीवार यांनी काल विधानसभेत दिली.

मुंबईत परळमध्ये बीआयटी चाळीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं भव्य स्मारक उभारण्यासाठी सरकारची भूमिका अतिशय सकारात्मक आहे, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली.

पुण्याच्या कल्याणीनगर भागात मे महिन्यात झालेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणाच्या तपासात पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अतिशय तत्परतेनं काम केलं असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत स्पष्ट केलं.

**<u>निवडणूक</u>**

विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. विधान परिषदेच्या 11 जागांसाठी 12 उमेदवार रिंगणात आहेत; त्यासाठी विधान सभेचे सदस्य मतदान करणार आहेत. आज सकाळी 9 ते दुपारी 4 दरम्यान मतदान होऊन आजच संध्याकाळी मतमोजणी होणार आहे.

भाजपाकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे रिंगणात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाणे आणि भावना गवळी, तर काँग्रेसकडून प्रज्ञा सातव ही निवडणूक लढवत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर शेकापचे जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने ही निवडणूक लढवत आहेत.

**<u>पूजा खेडकर</u>**

भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारनं एक सदस्यीय समिती नेमली आहे. कर्मिक मंत्रालयातील अतिरिक्त सचिवांमार्फत ही चौकशी केली जाणार आहे. पूजा खेडकर या 2023च्या तुकडीच्या सनदी अधिकारी आहेत. त्यांच्यावर गैरवर्तणूक तसंच नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिलेल्या प्रमाणपत्राबाबत आरोप आहेत; याच संदर्भात ही समिती चौकशी करणार असून आपला अहवाल दोन आठवड्यात सादर करणार आहे. खेडकर यांनी त्यांचं प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वीच स्वतंत्र कक्ष, वाहन, निवासी सुविधा अशा मागण्या केल्याचं पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी दिलेल्या अहवालात म्हटलं आहे. त्यांच्या या विनंत्या नाकारण्यात आल्या असून, त्यांची पुण्याहून वाशिम इथं बदली करण्यात आली आहे.

**<u>नीट-लातूर</u>**

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयानं 18 जुलैपर्यंत पुढे ढकलली आहे. दरम्यान या प्रकरणात सीबीआय कोठडीत असलेला आरोपी गंगाधरन यांची कोठडी आणखी चार दिवसांनी वाढवण्यात आली आहे.

**<u>पेरणी</u>**

राज्यात खरिपाचं एकंदर क्षेत्र एक कोटी 42 लाख हेक्टर आहे, त्यापैकी एक कोटी 17 लाख हेक्टरवर म्हणजे सरासरी 83 टक्के क्षेत्रावर आतापर्यंत पेरण्या पूर्ण झाल्या आहेत, अशी माहिती पुणे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी काल दिली. याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले.....

**पुण्यभूषण**

यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार जेष्ठ संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांना जाहीर झाला आहे. येत्या 20 जुलै रोजी इन्फोसिसचे संस्थापक अध्यक्ष नारायण मूर्ती यांच्या हस्ते भटकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही घोषणा केली.

**पालखी-सोलापूर**

विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन पंढरीकडे निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचं काल सोलापूर जिल्ह्यात धर्मपुरी इथं आगमन झालं. काल माऊलींच्या पालखीचा मुक्काम नातेपुते इथं होता; तर जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम काल सराटी इथं होता, आज पादुकांना नीरास्नान घालण्यात येईल.

**नक्षलवादी शरणागती-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील दोन जहाल नक्षलवाद्यांनी काल पोलिसांसमोर शरणागती पत्करली. प्रमिला बोगा उर्फ मंजुबाई आणि अखिला संकेर पुडो उर्फ रत्नमाला उर्फ आरती अशी या नक्षलींची नावं आहेत. त्यांच्यावर सरकारनं 16 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

**हुतात्मा कदम-नांदेड**

सीमा सुरक्षा दलात कार्यरत असलेले हुतात्मा कामेश कदम यांच्या पार्थिव देहावर काल नांदेड इथ शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. कामेश कदम यांना 9 जुलै रोजी हरियाणातील गुडगाव इथं वीरमरण आलं होतं.

**विद्युत भागवत-निधन**

स्त्रीवादी लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या विद्युत भागवत यांचं काल पुण्यात हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं; त्या 77 वर्षांच्या होत्या. गेल्या चार दशकांहून अधिक काळ राज्यातल्या महिला, विद्यार्थी, दलित आणि शेतकऱ्यांच्या चळवळीशी त्यांचं नातं होतं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात महिला अध्ययन केंद्राच्या संस्थापक संचालक म्हणून त्यांनी काम पहिलं. महिलांचे प्रश्न, स्त्रीवादी सिद्धांत, या बरोबरच शैक्षणिक विषयावरही त्यांनी विपुल लेखन केलं.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.